TATA

TATA PROJECTS

# अँटि-ब्रायबरी अँड अँटि-करप्शन (ABAC) पॉलिसी
# (लाचलुचपतविरोधी आणि भ्रष्टाचारविरोधी धोरण)

(धोरण क्रमांक: 03.02.01/P-02/R1)

| संशोधन | जारीकरणाची तारीख | जारीकर्ता |
|---|---|---|
| 01 | 03.01.2022 | |
| | | चीफ एथिक्स कौन्सेलर (CEC) |

# अँटि-ब्रायबरी अँड अँटि-करप्शन (ABAC) पॉलिसी

## आशय


I. उद्देश ....................................................3

II. व्याप्ती आणि उपयोजन....................................................3

III. धोरण विधान (पॉलिसी स्टेटमेंट)....................................................4

IV. व्याख्या....................................................4

V. सामान्य तत्त्वे ....................................................7

VI. जबाबदाऱ्या....................................................11

VII. संवाद आणि प्रशिक्षण ....................................................12

VIII. जेव्हा लाच किंवा फॅसिलिटेशन पेमेंटसाठी भाग पाडले जाते ....................................................13

IX. चिंताजनक मुद्दयांची माहिती देणे आणि तपास....................................................13

X. दंड ....................................................14

**XI.** ABAC धोरणात सुधारणा....................................................14

XII. संलग्नक (ॲनेक्शुअर) A – लागू नियमने....................................................15

XIII. संलग्नक (ॲनेक्शुअर) B – धोक्याचे निदर्शक (रेड फ्लॅग इंडिकेटर्स) ....................................................18

XIV. संलग्नक (ॲनेक्शुअर) C – कर्मचाऱ्याद्वारे घोषणापत्राचा मसुदा ....................................................19

## I. उद्देश

a. टाटा कोड ऑफ कॉण्डक्ट ("TCOC") 2015 मध्ये निश्चित करण्यात आलेल्या प्रमुख तत्त्वांपैकी एकामध्ये नमूद करण्यात आले आहे: 'आम्ही सर्वोच्च नैतिक तसेच नीतीमत्ताविषयक मानकांचे पालन करून आमचा व्यवसाय करण्यासाठी बांधील आहोत. कोणत्याही स्वरूपातील लाचलुचपत व भ्रष्टाचार आम्ही खपवून घेत नाही. आम्ही जे काही करतो, त्याच्या पार्श्वभूमीला ही बांधिलकी असते.'

b. टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडने ("कंपनी") TCOCचा स्वीकार केला असून, ती जेथे जेथे काम करते तेथील व्यावसायिक व्यवहार व संबंधांमध्ये व्यावसायिकता, न्याय व निष्ठा राखण्यासाठी तसेच लाचलुचपत व भ्रष्टाचार यांना विरोध करण्याच्या दृष्टीने योग्य त्या प्रक्रिया अमलात आणण्यासाठी व लागू करण्यासाठी, बांधील आहे. यामध्ये सर्व देशांतर्गत व परदेशी कायद्यांचे पालन करणे; अनुचित पेमेंट्स, भेटवस्तू यांची देवाणघेवाण न करणे; तसेच खासगी वा सरकारी अधिकारी, ग्राहक व पुरवठादार अशा कोणाही व्यक्तीच्या प्रलोभनाला बळी न पडणे किंवा प्रलोभन न देणे यांचा समावेश होतो.

c. लाचलुचपत, फॅसिलिटेशन पेमेंट्स (काम सुलभ करण्यासाठी पैसे देणे) किंवा भ्रष्टाचार यांच्याशी निगडित कोणतेही कृत्य किंवा आचरण यांचा प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, मार्गदर्शक तत्त्वे आणि सुयोग्य प्रक्रिया विकसित करणे, हे लाचलुचपतविरोधी व भ्रष्टाचारविरोधी धोरणाचे ("ABACपॉलिसी") उद्दिष्ट आहे.

d. या धोरणानुसार आमच्या सर्व कंपनी कर्मचाऱ्यांनी संशयास्पद व्यवहार, वर्तन किंवा आचरण ओळखणे आवश्यक आहे तसेच अशा वर्तन किंवा आचाराविरोधात निश्चित प्रक्रियांची पूर्तता करणे, नोंद घेणे व पालन करणेही आवश्यक आहे.

## II. व्याप्ती आणि उपयोजन

a. ABAC धोरण हे आमच्या कंपनीला आणि कंपनीसाठी तसेच कंपनीद्वारे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे केल्या जाणाऱ्या सर्व कृतींना, लागू आहे. या ABAC धोरणाचा स्वीकार सर्व उपकंपन्या, सहयोगी कंपन्या व जॉइंट व्हेंचर्सच्या बोर्डांनी करावा, अशी शिफारस आमची कंपनी करेल.

b. ही ABAC पॉलिसी सर्व स्तरांवर व सर्व श्रेणींमध्ये काम करणाऱ्या सर्व व्यक्तींना लागू आहे, यांमध्ये संचालक, वरिष्ठ व्यवस्थापक, अधिकारी आणि अन्य कर्मचारी (कायमस्वरूपी, निश्चितकालीन किंवा तात्पुरत्या नियुक्तीवरील), कन्सल्टण्ट्स, कंत्राटदार, प्रशिक्षणार्थी, इंटर्न्स, दुय्यम स्टाफ, अस्थायी कामगार व एजन्सी स्टाफ, एजंट्स, किंवा आमच्या कंपनीशी निगडित अन्य कोणीही व्यक्ती, यांमध्ये कॉम्प्लायन्स ऑफिसरने (खाली दिल्याप्रमाणे) वेळोवेळी आमच्या वतीने कृती करण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींचाही समावेश होतो. (वर उल्लेख केलेल्या सर्वांचा उल्लेख यापुढे 'एम्प्लॉयीज किंवा कर्मचारी' असा केला जाईल).

## III. धोरण विधान (पॉलिसी स्टेटमेंट)

1. आम्ही कोणत्याही स्वरूपातील किंवा कोणत्याही पद्धतीची लाचलुचपत किंवा भ्रष्टाचार खपवून घेत नाही. कोणत्याही स्वरूपातील किंवा कोणत्याही पद्धतीच्या लाचलुचपत व भ्रष्टाचाराला प्रतिबंध करण्यासाठी, अटकाव करण्यासाठी, हे प्रकार ओळखण्यासाठी तसेच त्यांना विरोध करण्यासाठी, योग्य प्रक्रियांची अमलबजावणी करण्यास तसेच प्रवर्तन करण्यास, आमची कंपनी बांधील आहे.
2. या बांधिलकीचा एक भाग म्हणून, कोणत्याही स्वरूपाची ऑफर देणे, ऑफर देण्याचा वायदा करणे किंवा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षात स्वरूपात लाच घेणे तसेच भ्रष्टाचाराच्या कृत्यात सहभाग घेणे यांस मनाई आहे. ही बांधिलकी आमच्या व्यवसायाच्या प्रत्येक अंगात दिसून येईल.
3. आमची कंपनी प्रत्येक व्यवहारांचे तपशीलवार व अचूक लेखापुस्तक राखण्यास वचनबद्ध आहे, जेणेकरून, लाचलुचपत किंवा भ्रष्टाचार ओळखण्यात मदत व्हावी.
4. या ABAC धोरणाचे कोणत्याही प्रकारे झालेले उल्लंघन गांभीर्याने घेतले जाईल आणि त्याची परिणती शिस्तभंगाच्या कारवाईत होईल. शिवाय बहुतेक देशांतील कायद्यांनुसार काटेकोर उत्तरदायित्व घालून देण्यात आलेले आहे. काही प्रकरणांत तर कर्मचारी तसेच आपल्या व्यवसायातील लाचखोरी रोखण्यात अपयशी ठरलेल्या संचालकांवर फौजदारी कारवाई करण्याचीही तरतूद आहे. हे ABAC धोरण किमान मानक प्रस्थापित करते आणि कंपनीचा व्यवसाय व कार्यक्षेत्र असलेल्या सर्व देशांमध्ये या मानकांची पूर्तता झालीच पाहिजे. हे
5. ABAC धोरण एखाद्या देशातील भ्रष्टाचारविरोधी कायद्यांच्या तुलनेत, यांत लागू स्थानिक कायदे तसेच सीमाबाह्य कायद्यांचा समावेश होतो, कंपनीचे मानक कायद्यांच्या तुलनेत अधिक कठोर असले तरीही कंपनीला लागू असलेल्या किमान मानकांचे पालन झालेच पाहिजे. मात्र, लागू लाचलुचपतविरोधी व भ्रष्टाचारविरोधी कायदे या ABAC धोरणाहून कठोर असतील, तर त्या परिस्थितीत त्या कायद्यांचे पालन झालेच पाहिजे.
6. या ABAC धोरणातील मार्गदर्शक तत्त्वे पुढील धोरणांसोबत वाचली जावीत:
   i. टाटा कोड ऑफ कॉण्डक्ट;
   ii. व्हिसल ब्लोअर धोरण;
   iii. गिफ्ट्स अँड हॉस्पिटॅलिटी धोरण;
   iv. ABAC धोरणाला धरून प्रसिद्ध झालेले कोणतेही मार्गदर्शन;
   v. वेळोवेळी अमलात आणली गेलेली अन्य संबंधित धोरणे.

## IV. व्याख्या

### a. लाचलुचपत (ब्रायबरी)

लाचलुचपत म्हणजे बेकायदा, अनैतिक, विश्वासभंगाचे कृत्य उद्युक्त करण्यासाठी, अवाजवी लाभाच्या स्वरूपात, दिला जाणारा प्रस्ताव, वायदा, भेट, केली जाणारी मागणी किंवा स्वीकार होय. लाचलुचपतीमध्ये बहुतेकदा पैसे देण्याचा (पेमेंट्स) सहभाग असतो (किंवा पैसे देण्याचा वायदा असतो) पण यामध्ये मूल्य स्वरूपातील बाबींचाही सहभाग असतो- अनुचित भेटवस्तू देणे, आतिथ्य किंवा मनोरंजन करणे, आतील माहिती पुरवणे किंवा लैंगिक वा अन्य कोणत्या स्वरूपाचा उपकार; नातेवाईकाला नोकरीचा प्रस्ताव देणे;

प्रवास खर्चाची हमी देणे; कामाचा अवमान करणे (अब्युज ऑफ फंक्शन) किंवा अन्य कोणते ठळक उपकार स्वीकारणे ही त्याची उदाहरणे आहेत. लाचलुचपत म्हणजे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, मध्यस्थाच्या मार्फत पुरवलेले लाभ होय. वरीलपैकी काहीही करण्याचा प्रयत्नही लाचलुचपतीमध्ये येतो.

**b. भ्रष्टाचार**

अधिकारपदावरील व्यक्ती किंवा सत्तेतील व्यक्तींनी बेकायदा, अनैतिक किंवा नीतीमत्तेच्या मानकांना अनूकूल नसलेल्या साधनांद्वारे केलेले चुकीचे कृत्य म्हणजे भ्रष्टाचार होय. भ्रष्टाचाराचे कृत्य साधारणपणे आर्थिक फायदा किंवा व्यक्तिगत लाभ मिळवण्याच्या हेतूने केले जाते. उदाहरणार्थ, पैशाच्या स्वरूपात देऊ केली जाणारी किंवा वायदा केली जाणारी लाच, मौल्यवान वस्तू, एखाद्या अधिकारी क्षमतेतील व्यक्तीच्या निर्णयावर चुकीच्या पद्धतीने प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने दिला जाणारा लाभ.

**c. भेटवस्तू, आतिथ्य आणि मनोरंजन**

भेटवस्तू म्हणजे मूल्य असलेली कोणतीही वस्तू आणि यात कोणत्याही अकारण दिल्या जाणाऱ्या पैशाच्या स्वरूपातील किंवा अन्य स्वरूपातील लाभांचाही समावेश होतो. भेटवस्तूच्या संकल्पनेत रोख पैसा, मौल्यवान धातू व खडे, दागिने, कलाकृती किंवा यासमान कोणत्याही मूर्त वस्तूंचा तसेच डिसकाउंट्स, सेवा, कर्ज, उपकार, विशेष अधिकार, लाभ, फायदे व सामान्य लोकांना उपलब्ध नसलेले हक्क आदी अमूर्त बाबींचा समावेश होतो. आतिथ्यामध्ये साधारणपणे खाद्यपदार्थ, जेवण, प्रवास आणि मुक्काम यांचा समावेश होतो.

मनोरंजनामध्ये साधारणपणे सुटीतील सहली, मनोरंजनाच्या सुविधांचा वापर, नाटक/मैफिल/क्रीडासामन्यांची तिकिटे किंवा पास यांचा समावेश होतो. आतिथ्य व मनोरंजन मूल्य व वारंवारतेची वाजवी सीमा ओलांडत असल्यास, भेटवस्तूच्या वर्गातच मोडतील.

**d. सार्वजनिक अधिकारी/परदेशी सार्वजनिक अधिकारी**

"सार्वजनिक अधिकारी" या व्याख्येत पुढील घटकांचा समावेश होतो:

i. सरकारचे संसदीय, कार्यकारी किंवा प्रशासकीय कार्यालय धारण करणारी किंवा सरकारच्या संसदीय, कार्यकारी किंवा प्रशासकीय कार्यालयाच्या वतीने किंवा अधिकृत क्षमतेत काम करणारी कोणतीही व्यक्ती; यात नियुक्त किंवा निर्वाचित, कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या, पगारी किंवा बिनपगारी अशा सर्वांचा समावेश होतो;

ii. सरकारच्या सेवेतील वा वेतनातील; केंद्रीय, प्रादेशिक वा राज्यस्तरीय कायद्यानुसार स्थापन झालेले महामंडळ किंवा प्राधिकरण किंवा सरकार वा सरकारी कंपनीद्वारे नियंत्रित किंवा सहाय्यप्राप्त मंडळावरील, किंवा सरकारी कंपनीतील किंवा सार्वजनिक कर्तव्य पार पाडल्याबद्दल सरकारद्वारे शुल्क वा कमिशनद्वारे भरपाई दिली जाणारी कोणतीही व्यक्ती;

iii. कोणतेही न्यायाधीश, यामध्ये कायद्याने निर्णायक अधिकार दिलेली कोणतीही व्यक्ती, मग या अधिकारांचा वापर ती व्यक्ती स्वत: करत असेल किंवा कोणत्या मंडळाची सदस्य म्हणून करत असेल, मोडते;
iv. न्यायालयाने न्यायाच्या प्रशासनाशी संबंधित कोणतेही कर्तव्य पार पाडण्याचे अधिकार दिलेली व्यक्ती, यात अवसायक (लिक्विडेटर), प्राप्तकर्ता किंवा आयुक्तांचा समावेश होतो;
v. सार्वजनिक कर्तव्य निभावणारी कोणतीही व्यक्ती, यामध्ये देशाच्या देशांतर्गत कायद्यात तसेच एखाद्या प्रदेशात लागू विशिष्ट कायद्यामध्ये विहित केलेल्या सार्वजनिक एजन्सी किंवा सार्वजनिक एंटरप्राइजमधील व्यक्तींचा समावेश होतो;
vi. सार्वजनिक आंतरराष्ट्रीय किंवा बहुपक्षीय संस्थेचे, उदाहरणार्थ, संयुक्तराष्ट्रे, कोणतेही निर्वाचित किंवा नियुक्त अधिकारी किंवा कर्मचारी; आणि
vii. लागू कायदे व नियमांनुसार सार्वजनिक अधिकारी समजली जाणारी कोणतीही व्यक्ती.

**"परदेशी सार्वजनिक अधिकारी"** या संकल्पनेत, ढोबळपणे वर उल्लेख केलेल्या "सार्वजनिक अधिकाऱ्यांचा" समावेश होतो पण हा अधिकारी भारतीय न्यायक्षेत्रामध्ये येत नाही. "परदेशी सार्वजनिक अधिकाऱ्या"ची व्याख्या लागू स्थानिक नियमांमधील प्रचलित व्याख्येच्या अधीन आहे.

**e. फॅसिलिटेशन पेमेंट किंवा किकबॅक्स**

"फॅसिलिटेशन पेमेंट्स" म्हणजे नियमित किंवा आवश्यक कृतीनुसार कार्यवाही करण्यासाठी/ न करण्यासाठी किंवा कार्यवाहीचा वेग वाढवण्यासाठी/ रोखण्यासाठी, सार्वजनिक अधिकाऱ्यांना करण्यात आलेले अनधिकृत पेमेंट होय. याला काहीवेळा 'स्पीड' मनी किंवा 'ग्रीज' पेमेंट्स किंवा 'गुड-विल मनी' असे म्हटले जाते. फॅसिलिटेशन पेमेंट करणारी व्यक्तीकडे पूर्वीपासूनच आवश्यक कृतीसाठी कायदेशीर किंवा अन्य पात्रता असते. "किकबॅक्स" म्हणजे व्यावसायिक उपकाराच्या किंवा लाभाच्या मोबदल्यात केलेले पेमेंट होय.

**f. थर्ड पार्टी**

'थर्ड पार्टी' या संज्ञेमध्ये, कंपनीच्या संपर्कात येेणारी किंवा कंपनीशी व्यवहार करणारी, कोणतीही व्यक्ती किंवा संस्था येते. यांत कंपनीसाठी किंवा कंपनीच्या वतीने काम करणारे प्रत्यक्ष आणि संभाव्य क्लाएंट्स, व्हेण्डर्स, कन्सल्टण्ट्स, रिटेनर्स, एजंट्स, सल्लागार, वितरक, व्यवसाय सहयोगी, भागीदार (यांत शैक्षणिक संस्थांचा समावेश होतो), कंत्राटदार, पुरवठादार आणि सेवा पुरवठादार येतात.

**g. संबंधित नियमने**

कंपनी, आपल्या व्यवसायाच्या निमित्ताने ज्या न्यायक्षेत्रांमध्ये काम करते, तेथे लागू असलेल्या लाचलुचपतविरोधी व भ्रष्टाचारविरोधी कायद्यांचे पालन करते. यांमध्ये भारत (भ्रष्टाचार प्रतिबंध (सुधारणा) कायदा 2018), युनायटेड किंगडम (यूके ब्रायबरी ॲक्ट, 2010), आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (फॉरेन करप्ट प्रॅक्टिसेस ॲक्ट, 1977) आदी कायद्यांचा समावेश होतो. विशिष्ट कृत्य किंवा कृती न करणे हा गुन्हा ठरू शकतो का, हे निश्चित करण्यासाठी वेगवेगळे कायदे वेगवेगळ्या निकषांचा वापर करतात. "संबंधित नियमनां"ची यादी व महत्त्वाची अंगे अनेक्शुअर A मध्ये देण्यात आली आहेत.

## V. सामान्य तत्त्वे

### a. धोक्याचे मूल्यांकन

i. लाललुचपत आणि भ्रष्टाचाराचे धोके विविध घटकांमुळे बदलू शकतात, त्यामुळे आवश्यक सुरक्षा उभी करण्यासाठी धोक्यावर आधारित दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे.

ii. कंपनीची लाचलुचपत आणि भ्रष्टाचारविषयक धोक्याची रूपरेखा निश्चित करण्यासाठी धोक्याचे मूल्यांकन करून घेतले पाहिजे. यामध्ये बाह्य घटकांच्या परीक्षणाचा समावेश असला पाहिजे (उदाहरणार्थ, उद्योगक्षेत्र, भौगोलिक विस्तार, नियमनाची कक्षा वगैरे). त्याचप्रमाणे अंतर्गत घटकही (उदाहरणार्थ, धोरणे, प्रक्रिया, प्रशिक्षण कार्यक्रम, डेटा विश्लेषण आदी) विचारात घेतले पाहिजेत.

iii. निश्चित केलेल्या धोक्याच्या रूपरेखेनुसार, त्याच्या उपशमनासाठी आवश्यक पावले उचलली गेली पाहिजेत. धोका मूल्यांकन प्रक्रिया दर तीन वर्षांनी किंवा धोक्यावर परिणाम करणाऱ्या घटकांमध्ये मोठे बदल झाल्यास, उदाहरणार्थ, व्यवसायाचे स्वरूप, नवीन नियम आदी, त्यापूर्वीही केले गेले पाहिजे.

### b. भेटवस्तू, मनोरंजन आणि आतिथ्य

i. भेटवस्तू, मनोरंजन आणि आतिथ्य वाजवी प्रमाणात, चांगल्या हेतूने तसेच कंपनीचे धोरण, TCOC, कंपनीची गिफ्ट अँड हॉस्पिटॅलिटी पॉलिसी व वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या सूचनांची पूर्तता करणारे असेल, तर ते स्वीकारार्ह ठरू शकेल.

ii. कंपनीच्या व्यवसायादरम्यान किंवा नोकरीच्या कार्यकाळात कोणत्याही कर्मचाऱ्याने, या व्यवसायाशी किंवा नोकरीशी निगडित तथ्यात्मक मूल्यांकनाशी तडजोड होईल किंवा तडजोड झाल्यासारखी वाटेल, अशा प्रकारचा व्यक्तिगत लाभ कोणाही व्यक्तीकडून स्वीकारू नये किंवा त्यासाठी मागणी करू नये.

iii. कंपनी किंवा कंपनीच्या व्यवसाय सहयोगींचे कंत्राटी संबंध असलेल्या किंवा ज्यांच्याशी करारासाठी वाटाघाटी करायवयाच्या आहेत अशा व्यक्तींना, वर्तमान किंवा संभाव्य ग्राहकांना, त्यांचे एम्प्लॉयर किंवा एजंट किंवा अन्य कोणाही व्यक्तीला (यांमध्ये सार्वजनिक अधिकाऱ्यांचा समावेश होतो पण ते तेवढ्यापुरते मर्यादित नाही), भेटवस्तू देऊ करण्यास किंवा व्यवसायाच्या सामान्य प्रक्रियेबाहेर जाऊन उपकृत करण्यास, कर्मचाऱ्यांना मनाई आहे.

### c. फॅसिलिटेशन पेमेंट्स किंवा किकबॅक्स

i. कोणत्याही प्रकारची फॅसिलिटेशन पेमेंट्स किंवा किकबॅक्स ही अनुचित पेमेंट्स आहेत आणि कंपनीच्या व्यवसायादरम्यान किंवा नोकरीच्या काळात अशा प्रकारची कोणतीही पेमेंट्स करण्यास सक्त मनाई आहे.

### d. ग्राहकांशी संवाद

i. जेव्हा ग्राहकाशी नातेसंबंध ठेवण्याची जबाबदारी कर्मचाऱ्यावर असते, तेव्हा तो/ती, कंपनीच्या गिफ्ट अँड हॉस्पिटॅलिटी पॉलिसीचे काटेकोर पालन करून, ग्राहकाचे सद्हेतूने आतिथ्य करू शकतो/ते. अशा आतिथ्याची नोंद गिफ्ट अँड हॉस्पिटॅलिटी पॉलिसीनुसार ठेवणे आवश्यक आहे.

ii. व्यवसायाच्या सामान्य क्रमामध्ये ग्राहकांना सवलती (डिसकाउंट्स) व रिबेट्स देऊ करण्याची पद्धत खासगी व सार्वजनिक दोन्ही क्षेत्रांमध्ये आहे. ही उद्योगक्षेत्रातील सामान्य पद्धत असली, तरी व्यवस्थांमधील विस्तृत वैविध्य आणि त्यातील काहींमध्ये तुलनेने असलेली जटीलता यांमुळे काही बाबतीत धोका निर्माण होऊ शकतो. यातील काही व्यवस्थांमध्ये, व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधींसाठी, छुप्या स्वरूपाची अनुचित प्रलोभने असू शकतात (उदाहरणार्थ, मोफत उत्पादने दिली जात आहेत या माहितीचा निवडक पद्धतीने प्रसार करणे), आणि म्हणूनच अशा व्यवस्था अमलात आणताना खूप काळजी घेणे आवश्यक आहे.

**e. थर्ड पार्टी एजंट्स, कन्सल्टण्ट्स आणि अन्य मध्यस्थांचा वापर**

i. आपली कंपनी लाचेपोटी पैसे देण्याचा अधिकार कोणालाही देत नसली तरी, कंपनीच्या वतीने थर्ड पार्टीद्वारे दिल्या गेलेल्या लाचेसाठीही, कंपनीला जबाबदार धरले जाऊ शकते. याचे परिणाम तीव्र व भरून न काढता येण्याजोगे असतात. म्हणूनच, थर्ड पार्टीची निवड काळजीपूर्वक करणे खूप महत्त्वाचे आहे.

ii. थर्ड पार्टीसोबतचे सर्व व्यवहार निष्ठेच्या सर्वोच्च मानकांचे पालन करून तसेच सर्व संबंधित व लागू कायदे-नियमांशी सुसंगती राखूनच झाले पाहिजेत. सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या कंपनीच्या प्रक्रियांचे अनुसरण करणे आवश्यक आहे तसेच अंतर्गत नियंत्रण प्रणालीला धरून राहणेही आवश्यक आहे. थर्ड पार्टीची निवड, कधीही भेटवस्तू प्राप्त झाल्याच्या किंवा तशा अपेक्षेच्या, आतिथ्याच्या, पैशाच्या किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या वा पद्धतीच्या उपकाराच्या मोबदल्यात, केली जाऊ नये.

iii. थर्ड पार्टीशी व्यवहार करण्यापूर्वी पुढील बाबी लक्षात घ्याव्यात:

- योग्य तेवढी चौकशी करावी आणि तिची नीट नोंद ठेवावी.
- करारामध्ये, TCOCव्यतिरिक्त, लाचलुचपतविरोधी तसेच भ्रष्टाचारविरोधी तरतुदींचा समावेश करावा, यामध्ये लेखापरीक्षणाच्या (ऑडिट) अधिकाराचा समावेश असावा तसेच भागीदार/पार्टी लाचलुचपतविरोधी व भ्रष्टाचारविरोधी अटींचे पालन करण्यास असमर्थ ठरल्यास करार रद्द करण्याचेही कलम असावे.
- थर्ड पार्टीकडून या मानकांची पूर्तता करण्याचा औपचारिक लेखी वायदा मागण्यात यावा.

iv. थर्ड पार्टीशी करार करण्यातून, कंपनीला किती धोका निर्माण होऊ शकतो यावर चौकशीची प्रक्रिया आधारित असावी. उदाहरणार्थ, कंपनीच्या मूल्यानुसार, टाटा समूहाबाहेरील फर्म्सना दिली जाणारी टॉप-टेन कंत्राटे ( SCM व्याख्येनुसार, कॅट-4 पोटकंत्राटे) साधारणपणे लाचलुचपत व भ्रष्टाचाराच्या दृष्टीने 'अतिधोक्या'च्या प्रवर्गात टाकली जातात. हे वर्गीकरण नियमित कालावधीने केले जाते.

- अतिधोक्याच्या थर्ड पार्टीसाठी, प्रमोटर्स/महत्त्वाचा व्यवस्थापकीय कर्मचारी आणि सहभागी घटक यांसाठी तपशीलवार चौकशी प्रक्रिया केली जावी. यांत विविध पूर्तता डेटाबेस तसेच माध्यमांच्या नोंदी तपासणे, स्थळाला भेटी देणे, बाजाराचा अभ्यास, वित्तीय बाबींचे विश्लेषण आदींचा समावेश होतो. ही चौकशी प्रक्रिया थर्ड पार्टीशी संबंध जोडण्यापूर्वी केली जावी तसेच नियमित काळानंतर पुन्हा करत राहावी (किमान तीन वर्षांतून एकदा).
- कमी धोक्याच्या व्हेंडर्ससाठी आवश्यक चौकशी प्रक्रिया विविध पूर्तता डेटाबेस व माध्यमांच्या नोंदी तपासण्याएवढी मर्यादित असू शकते. या प्रकरणांमध्ये किमान पाच वर्षांतून एकदा चौकशी प्रक्रिया नव्याने केली जावी.

**f. सरकारशी आंतरक्रिया**

i. सरकारशी व्यवसाय करण्यावर बरेच नियमन ठेवले जाते आणि व्यावसायिक बाजारपेठेत केल्या जाणाऱ्या व्यवहारांच्या तुलनेत अधिक काटेकोर नियमांचे पालन केले जाते. जर तुम्ही सरकारी अधिकाऱ्यासोबत किंवा सरकारी मालकीच्या (किंवा अंशत: मालकीच्या) कंपनीसोबत काम करत असाल, तर लागू कायदे व नियम माहीत करून घेण्याचे व त्यांचे पालन करण्याचे, निष्ठेच्या सर्वोच्च मानकांना चिकटून राहण्याचे आणि अनौचित्याचा भासही निर्माण होऊ देणे टाळण्याचे, विशेष कर्तव्य तुम्हाला बजावावे लागेल. आपली कंपनी सरकार, सरकारी अधिकारी आणि सरकारी एजन्सींशी विविध स्वरूपात आंतरक्रिया करू शकते. उदाहरणार्थ: वैधानिक किंवा नियामक मंजुऱ्या मागणी, एक पुरवठादार म्हणून, एक ग्राहक म्हणून वगैरे. आपल्या कंपनीचे सरकार, सरकारी अधिकारी किंवा सरकारी एजन्सींपुढे प्रतिनिधित्व करताना आपल्या कर्मचाऱ्यांनी कायम सत्यवादी, अचूक, सहकार्यशील आणि सौहार्दपूर्ण वर्तन ठेवले पाहिजे.

**g. राजकीय, सामुदायिक किंवा सेवाभावी योगदाने आणि प्रायोजकत्व**

i. TCOC 2015च्या विभाग 1, कलम 1 म्हणते: “आपण ज्या देशांमध्ये काम करतो, तेथील राज्यघटना व प्रशासकीय प्रणालींशी सुसंगती राखून आपण कृती केली पाहिजे. सार्वत्रिक निवडणुकांच्या निष्पत्तीवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न आपण करत नाही तसेच कोणत्याही सरकारी प्रणालीमध्ये बदल घडवण्याचा किंवा तिच्या खच्चीकरणाचा आपला प्रयत्न नसावा. आपण कोणत्याही विशिष्ट राजकीय पक्षाला किंवा उमेदवाराला किंवा राजकीय कार्यालयाला पाठिंबा देत नाही. एखाद्या राजकीय मंडळाप्रती किंवा व्यक्तीप्रती परस्परालंबित्व/उपकार म्हणून ज्याकडे बघितले जाऊ शकते, असे कृत्य आपल्या आचारामध्ये टाळले गेले पाहिजे, आणि आपण कोणत्याही विशिष्ट राजकीय पक्षाला, उमेदवाराला किंवा मोहिमेला देणगी म्हणून कंपनीचा निधी किंवा मालमत्ता किंवा संसाधने देऊ करत नाही किंवा देत नाही.”

ii. प्रशासनाची लोकशाही पद्धती स्वच्छ निवडणूक प्रक्रियेद्वारे बळकट केली जावी या हेतूने कोणत्याही आर्थिक योगदानाचा विचार आपल्या संचालक मंडळाने केला, तर हे योगदान भारतात केवळ प्रोग्रेसिव इलेक्टोरल ट्रस्टच्या माध्यमातून केले जाईल आणि भारताबाहेरही तेवढ्याच पारदर्शक, आवश्यक अधिकारप्राप्त, भेदभाव न करणाऱ्या तसेच व्यक्तीच्या विवेकबुद्धीवर आधारित नसलेल्या यंत्रणेच्या माध्यमातून केले जाईल.

iii. बोर्डाने TCOCनुसार तसेच लागू कायद्यांची पूर्तता करून, मंजूर केलेल्या राजकीय योगदानांचा अपवाद वगळता, कंपनीचा निधी, मालमत्ता किंवा अन्य संसाधनांतून राजकीय योगदाने करण्याची परवानगी कर्मचाऱ्यांना नाही.

iv. आपली कंपनी मानवतावादी आवश्यकता व अन्य काही मुद्दयांसाठी सेवाभावी योगदाने देऊ शकते. यांमध्ये आपत्कालीन स्थिती तसेच आपत्ती मदतीचा समावेश होतो. ही योगदाने आपल्या कंपनीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी धोरणानुसार (“CSR पॉलिसी”) करणे आवश्यक आहे. अर्थात देणगी देताना आपण आवश्यक तेवढी सावधगिरी बाळगली पाहिजे. देणगी ही कोणीही मागणी न करता किंवा अपेक्षा व्यक्त न करता दिली जावी, जेणेकरून, आपण दिलेल्या देणग्यांकडे कोणत्याही

स्वरूपात किंवा पद्धतीने, प्रलोभन म्हणून बघितले जाऊ नये. अशा रितीने, कंपनीने समुदाय प्रकल्प किंवा सेवाभावी कामांसाठी दिलेले योगदान चांगल्या हेतूने तसेच आपल्या TCOC, ABAC आणि अन्य सर्व संबंधित धोरणे व प्रक्रियांची व त्यात वेळोवेळी झालेल्या बदलांची पूर्तता करणारे असावे.

v. असे योगदान देण्यापूर्वी कर्मचाऱ्याने पुढील बाबींची खात्री करावी:
- सेवाभावी योगदान हे कोणत्याही व्यावसायिक करारावर अवलंबून नाही, किंवा व्यावसायिक करारासाठी केलेले नाही.
- योगदान हे नेहमी सेवाभावी कार्याला केले जाईल, विशिष्ट व्यक्तीला केले जाणार नाही. नैसर्गिक आपत्तींच्या पीडितांना थेट देणगी किंवा अनुदान देणे अपेक्षित आहे अशा परिस्थितीत, कंपनीच्या CSR धोरणाची पूर्तता करून, याला अपवाद केला जाऊ शकतो.
- जेथे योगदानाचा अखेरचा वापर ज्ञात आणि/किंवा नियंत्रित आहे, अशाच घटकांना योगदान दिले जावे.
- देशातील लागू कायद्यांखाली नोंदणीकृत सेवाभावी संस्थांनाच योगदान दिले जावे.
- सेवाभावी संस्थांची पार्श्वभूमी तपासण्याचे काम सर्व प्रकरणांमध्ये शक्य तोवर केले जावे, विशेषत: देणगी स्वरूपात दिलेला पैसा बेकायदा कारवायांसाठी जात नाही याची खातरजमा करण्यासाठी हे विशेषत्वाने गरजेचे आहे. त्याचप्रमाणे यात मनी लाँडरिंगविरोधी, दहशतवादविरोधी किंवा अन्य संबंधित कायद्यांचे उल्लंघन होत नाही याचीही खातरजमा करण्यासाठी हे आवश्यक आहे.
- स्थानिक कायदे व पद्धतींखाली कायदेशीर व नैतिक आहेत अशीच सेवाभावी योगदाने दिली जावीत.

vi. प्रायोजकत्वे (स्पॉन्सरशिप्स) आपल्या कंपनीद्वारे राबवल्या जाणाऱ्या अनेक प्रकारच्या समुदाय/व्यवसाय उपक्रमांशी निगडित असतात. यांमध्ये शैक्षणिक शिष्यवृत्तींपासून ते स्थानिक क्रीडा संघांना दिल्या जाणाऱ्या प्रायोजकत्वाचा समावेश होतो. कोणतेही प्रायोजकत्व हे अस्सल व्यावसायिक किंवा सेवाभावी उद्दिष्टाने दिले जाणे अत्यावश्यक आहे, यामध्ये कशाच्या तरी मोबदल्यात लाभ देण्याचा प्रकार नसावा. अशा प्रकारचे प्रायोजकत्व आपल्या कंपनीच्या CSR किंवा अन्य कोणत्याही लागू धोरणानुसार, पारदर्शक, मंजुरीप्राप्त, व्यवस्थित नोंद केलेले, असावे.

**h. विलीनीकरणे आणि अधिग्रहणे, जॉइंट व्हेंचर्स, भागीदाऱ्या**

i. ज्या व्यवसायात गुंतवणूक करायची आहे त्या व्यवसायाबद्दल आपली कंपनी पूर्ण चौकशी करेल. या व्यवसायाद्वारे होणाऱ्या, लाचलुचपतविरोधी व भ्रष्टाचारविरोधी प्रक्रियांच्या पूर्ततेबाबत तसेच व्यवसायाचा लौकिक व निष्ठा यांबद्दल योग्य व वाजवी अभ्यास कंपनीद्वारे केला जाईल.

ii. जेव्हा आपली कंपनी एखादा व्यवसाय अधिग्रहित करत असेल किंवा नियंत्रण वा भागीदारी वा तत्सम व्यवसाय व्यवस्थेच्या माध्यमातून जॉइंट व्हेंचरमध्ये प्रवेश करत असेल, तेव्हा टाटा कोड ऑफ कॉण्डक्ट आणि संबंधित धोरणे, यांचा विस्तार समोरच्या व्यवसायातही केला जाईल, या व्यवसायातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल, कंपनी मानकांखाली थर्ड पार्टीचे पुन्हा मूल्यमापन केले जाईल आणि जेथे गरज भासेल, तेव्हा या व्यवसायांचे लेखापरीक्षणही (ऑडिट) केले जाईल.

**i. हिशेब, नोंदी आणि अंतर्गत नियंत्रण आवश्यकता**

i. नोंदी अचूक व संपूर्ण राखणे हे आपल्या कंपनीच्या यशस्वी कामकाजासाठी अत्यावश्यक आहे तसेच आपल्यावरील कायदेशीर व नियामक बंधनांचे पालन करण्यासाठीही हे गरजेचे आहे. कंपनीच्या सर्व अंतर्गत व बाह्य दस्तावेजांमध्ये जी माहिती दिली जाते किंवा ज्या नोंदी केल्या जातात, त्या अचूक, संपूर्ण व प्रामाणिक असणे ही प्रत्येक कर्मचाऱ्याची जबाबदारी आहे. यामध्ये हिशेबाच्या नोंदी, टाइमकार्ड्स, खर्चाचे अहवाल, देयके (इनव्हॉइसेस), पेरोलच्या नोंदी, सुरक्षितता नोंदी, व्यवसायातील नोंदी, कामगिरीचे मूल्यमापन, कंत्राटे आदींचा समावेश होतो पण हे एवढ्यापुरते मर्यादित नाही.

ii. सर्व व्यवसाय एकके (युनिट्स) आणि घटकांनी आपल्या व्यवहारांच्या अंतर्गत नियंत्रणासाठी तसेच देखरेखीसाठी प्रभावी प्रणाली राखणे अत्यावश्यक आहे. आपल्या धोरणांमध्ये काही विशिष्ट देखरेख नियंत्रणे नमूद करण्यात आली आहेत, विशेषतः प्रवास व मनोरंजन खर्चाच्या मंजुरीसाठी विशिष्ट नियंत्रणे आहेत.

iii. आपल्या नोंदी व्यवस्थापन व जतनीकरण धोरणाद्वारे, कायदेशीर, करविषयक आणि नियामक आवश्यकतांच्या पूर्ततेसाठी आवश्यक नोंदी, राखल्या जातात. त्याचप्रमाणे ज्या नोंदींची आवश्यकता संपलेली आहे किंवा ज्यांचा वैधानिक जतनीकरण कालावधी उलटला आहे, अशा नोंदीची सुरक्षितपणे विल्हेवाटही लावली जाते.

## VI. जबाबदाऱ्या

**a. लेखा समिती (ऑडिट कमिटी)**

i. कंपनीची ऑडिट कमिटी ("बोर्ड") या ABAC धोरणाच्या प्रशासनावर तसेच पूर्ततेवर निरीक्षण ठेवते. या ABAC धोरणाच्या उल्लंघनाची गंभीर प्रकरणे तातडीने ऑडिट कमिटीपुढे ठेवली जातील.

ii. ऑडिट कमिटी ABAC धोरणाच्या परिणामकारकतेवर लक्ष ठेवेल आणि त्याची अनुकूलता, पर्याप्तता आणि परिणामकारकता यांचा विचार करून अमलबजावणीचे परीक्षण करेल.

**b. चीफ एथिक्स कौन्सेलर**

i. ABAC धोरणाच्या तरतुदींची पूर्तता होत आहे हे निश्चित करण्यासाठी, कंपनी, वेळोवेळी पुरेशी ज्येष्ठता, क्षमता व स्वातंत्र्य असलेल्या कर्मचाऱ्याची नियुक्ती, चीफ एथिक्स कौन्सेलर म्हणून करेल आणि याची सूचना सर्व कर्मचाऱ्यांना दिली जाईल.

ii. ABAC धोरणाशी संबंधित प्रशिक्षण तसेच जागरूकता सत्रे कर्मचाऱ्यांना नियमित व संदर्भासह उपलब्ध करून दिली जातील याची काळजी चीफ एथिक्स कौन्सेलरने घेतली पाहिजे.

iii. ABAC धोरणाशी निगडित सर्व अहवाल, तक्रारी किंवा चिंता चीफ एथिक्स कौन्सेलरपुढे ठेवल्या जातील. कोणत्याही कर्मचाऱ्याला, लाचलुचपत किंवा भ्रष्टाचाराशी संबंधित चौकशी, चिंता किंवा तक्रार प्राप्त झाल्यास, त्याने/तिने ती त्वरित, चीफ एथिक्स कौन्सेलरला, कळवणे आवश्यक आहे.

iv. ABAC धोरणाच्या संशयित उल्लंघनाबाबत उपस्थित झालेल्या प्रत्येक शंकेचे किंवा चिंतेचे परीक्षण/तपास चीफ एथिक्स कौन्सेलर करतील. काही कार्यवाही करण्याची आवश्यकता असेल, तर तीही चीफ एथिक्स कौन्सेलरच या ABAC धोरणाखाली करतील.

**c. कर्मचारी**

i. कर्मचाऱ्यांनी, त्यांच्यासाठी घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षण सत्रांमध्ये सहभागी होऊन तसेच कंपनीद्वारे वेळोवेळी जारी मार्गदर्शक तत्त्वे समजून घेऊन, ABAC पॉलिसी, अन्य धोरणे, प्रक्रिया तसेच गिफ्ट अँड हॉस्पिटॅलिटीसारख्या नियंत्रणांची नीट माहिती करून घेतली पाहिजे.

ii. कर्मचाऱ्यांनी या ABAC धोरणाचे पालन करणे अत्यावश्यक आहे तसेच आपल्या कंपनीच्या प्रक्रिया व ABAC धोक्यांच्या उपशमनाचे उपाय पाळले तसेच बळकट केले जातील याची काळजी घ्यावी. एखाद्या कृतीमुळे ABAC धोरणाचे उल्लंघन होईल अशी शंका आल्यास दोन पावले मागे जावे व स्वतःला या कृत्याबद्दल खालील प्रश्न विचारावे:

- हेतू काय आहे- या कृत्याकडे अवाजवी फायदा घेणारे किंवा देणारे म्हणून बघितले जाईल का?
- हे तपशील प्रमुख वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर किंवा सोशल मीडियावर आले तर कसे दिसतील?

iii. या ABAC पॉलिसीबद्दल काही संभ्रम निर्माण झाला किंवा एखादे कृत्य या ABAC पॉलिसीचे संभाव्य उल्लंघन ठरू शकेल की काय असे वाटले, तर टाटा (कंपनीचे नाव) कर्मचाऱ्याने कॉम्प्लायन्स ऑफिसर किंवा एथिक्स कौन्सेलरचा सल्ला घेतला पाहिजे.

iv. आतिथ्य, भेटवस्तू, सेवाभावी देणग्या किंवा थर्ड पार्टीला करण्यात आलेली पेमेंट्स यांसाठी केलेल्या खर्चाचे दावे, लागू धोरणांचे पालन करून, सादर केले जातील तसेच या सर्व खर्चांच्या दाव्यांमध्ये खर्चामागील कारणे विशेषत्वाने नमूद केली जातील, याची काळजी कर्मचाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे.

v. व्यवस्थापकीय हुद्दयावरील कर्मचाऱ्यांनी, त्यांच्या टीमचे सदस्य ABAC धोरण व अन्य संबंधित धोरणांशी परिचित असतील याची, काळजी घ्यावी. या ABAC धोरणातील मार्गदर्शक तत्त्वांचे, त्यांच्या टीम सदस्यांकडून तसेच ते ज्या थर्ड पार्टींसोबत काम करत आहेत, त्यांच्याकडून पालन होत आहे यासाठी व्यवस्थापकीय हुद्दयावरील कर्मचारी मार्गदर्शन करतील व याची खातरजमा करतील.

vi. या धोरणाची पूर्तता होत नसल्याचे किंवा एखादा रेड फ्लॅग इंडिकेटर दिसून आल्यास त्याची माहिती देणे हे प्रत्येक कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे, (वाचा ॲनेक्शुअर B) जेणेकरून धोक्याचे उपशमन करण्यासाठी व त्यामुळे होणारे परिणाम टाळण्यासाठी कंपनी त्वरित आवश्यक कारवाई करू शकेल.

vii. या ABAC पॉलिसीच्या संभाव्य उल्लंघनाप्रकरणी कंपनीने घेतलेल्या किंवा कंपनी घेणार असलेल्या कोणत्याही चौकशी किंवा तपासासाठी कर्मचाऱ्यांनी संपूर्ण सहकार्य केले पाहिजे.

## VII. संवाद आणि प्रशिक्षण

a. हे ABAC धोरण, कर्मचाऱ्यांची कर्तव्ये, कंपनीच्या प्रक्रिया व उपाययोजना यांच्याशी निगडित प्रशिक्षण व जागरूकता सत्रे नियमित उपलब्ध करून दिली जातील. कंपनीच्या व्हिसलब्लोइंग प्रक्रियांचे तपशील संपूर्ण कंपनीमध्ये नियमितपणे प्रसारित केले जातील.

b. थर्ड पार्टींना सोपवण्यात आलेले कामाचे स्वरूप, ABAC पॉलिसीनुसार, धोकादायक असेल, तर थर्ड पार्टींसाठीही आपली कंपनी प्रशिक्षण कार्यक्रम घेऊ शकते.

## VIII. लाच किंवा फॅलिसिटेशन मनीसाठी सक्ती केली जाते तेव्हा

a. कोणत्याही प्रकारच्या लाच किंवा फॅसिलिटेेशन पेमेंटसाठी मनाई करण्यास कंपनी वचनबद्ध असली, तरीही एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत, अधिकारीपदावरील एखाद्या व्यक्तीने लाच किंवा फॅसिलिटेशन पेमेंटची मागणी केल्यामुळे, कर्मचारी किंवा थर्ड पार्टीच्या आरोग्याला व सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो, याची जाणीवही कंपनीला आहे. उदाहरणार्थ, एखाद्या जखमी कर्मचाऱ्याच्या त्वरित स्थलांतरासाठी सार्वजनिक अधिकाऱ्याने फॅसिलिटेशन पेमेंटची मागणी केल्यास अशी अपवादात्मक परिस्थिती निर्माण होऊ शकते.

b. अशा अपवादात्मक परिस्थितीत, कर्मचाऱ्यांनी, लाच किंवा फॅसिलिटेशन पेमेंटची मागणी मान्य करण्यापूर्वी, ते ज्या व्यवस्थापकाला रिपोर्ट करतात त्याचा किंवा चीफ एथिक्स कौन्सेलरचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. अशा अपवादात्मक परिस्थिती केलेल्या कोणत्याही पेमेंटची माहिती चीफ एथिक्स कौन्सेलरला सर्व तपशिलांसह 24 तासांच्या आत कळवली पाहिजे.

c. लीगल हेडने या प्रकरणाची माहिती संबंधित कायदा प्रवर्तन प्राधिकरणाला किंवा नियामक मंडळाला, या पेमेंटच्या तारखेपासून, सात दिवसांच्या आत दिली पाहिजे.

## IX. चिंताजनक मुद्दयांची माहिती देणे आणि तपास

a. कोणताही लाचलुचपतीचा मुद्दा किंवा भ्रष्ट पद्धत किंवा ABAC पॉलिसीचे कोणतेही उल्लंघन किंवा लागू ABAC कायद्याचे उल्लंघन यांबाबत लवकरात लवकर चिंता उपस्थित करण्यास प्रत्येक कर्मचाऱ्याला प्रोत्साहन दिले जाते. एखादे विशिष्ट कृत्य लाचलुचपतीचे किंवा भ्रष्टाचाराचे आहे का याबद्दल कर्मचाऱ्याला खात्री नसेल किंवा त्याला/तिला अन्य काही शंका आसेल, तर त्याबद्दल संबंधित रिपोर्टिंग व्यवस्थापकांशी आणि चीफ एथिक्स कौन्सेलरशी (ecounsellor@tataprojects.com) बोलणे आवश्यक आहे.

b. TCOC खालील 'रेजिंग कन्सर्न्स' यंत्रणेमार्फत किंवा 'व्हिसल-ब्लोअर' धोरणामार्फत, कर्मचारी, त्यांच्या चिंता किंवा शंका चीफ एथिक्स कौन्सेलरपुढे मांडू शकतात.

c. चांगल्या हेतूने ABAC धोरणाच्या उल्लंघनाची माहिती देणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याला छळ, सूड किंवा नोकरीबाबत वाईट परिणाम आधी सहन करावे लागणार नाही.

d. ABAC पॉलिसीच्या प्रत्यक्ष किंवा संभाव्य उल्लंघनाबाबत उपस्थित करण्यात आलेल्या शंकेबाबत, चीफ एथिक्स कौन्सेलर योग्य ती पावले उचलेल. ती पावले पुढीलप्रमाणे:

**तपास:**

i. ABAC पॉलिसीच्या संभाव्य उल्लंघनाबाबत उपस्थित करण्यात आलेल्या शंकेची चौकशी किंवा तपास चीफ एथिक्स कौन्सेलरद्वारे किंवा त्याच्या/तिच्या निरीक्षणाखाली केला जाईल. या चौकशी किंवा तपासाचे उद्दिष्ट तथ्ये निश्चित करणे हे असेल.

ii. सर्व तपासांमध्ये नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचे पालन केले जाईल आणि संबंधित कर्मचाऱ्याला तपास पथकापुढे आपली बाजू मांडण्याची संधी निश्चितपणे दिली जाईल.
iii. कथित शंकेचा तपास करण्यासाठी योग्य ज्ञान व कौशल्य असलेल्या तज्ज्ञांची नियुक्ती केली जाईल.
iv. तपास प्रक्रिया आणि अहवाल गोपनीय ठेवला जावा आणि ज्या व्यक्तींना, लागू कायदे किंवा कंपनीच्या नियमित तपास प्रक्रियेनुसार, त्याबद्दल "कळणे गरजेचे" आहे त्यांनाच तो पाठवला जावा.

**सुधारात्मक कारवाई:** आवश्यकता भासल्यास, संबंधित व्यवस्थापक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना, अमलबजावणीसाठी सुधारात्मक कृती घालून दिली जाईल किंवा सुचवली जाईल.

**शिस्तभंग कारवाई:** संबंधितांकडून मिळालेल्या माहितीवर विचार केल्यानंतर चीफ एथिक्स कौन्सेलर योग्य त्या शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करतील. यांमध्ये चूक करणाऱ्या कर्मचाऱ्याविरोधात निलंबनाची, सेवेतून बडतर्फीची किंवा कारवाई केली जाईल पण हे तेवढेच मर्यादित नसेल. उल्लंघन जर संभाव्य गुन्हेगारी स्वरूपाचे असेल तर चीफ एथिक्स कौन्सेलर लागू कायद्याखाली, संबंधित प्राधिकरणांना त्याची माहिती देण्याची, शिफारस करतील. फौजदारी किंवा नियामक कार्यवाहीदरम्यान, कर्मचारी संबंधित अधिकारप्राप्त व्यक्तींना सहकार्य करतील. चुकीचे स्वरूप आणि प्रमाण यांनुसार, चीफ एथिक्स कौन्सेलर, कंपनीला लागू कायद्याखाली उपलब्ध उपायांचे प्रवर्तन करता यावे या दृष्टीने, संबंधित कर्मचाऱ्याविरोधात दिवाणी आणि/किंवा फौजदारी प्रक्रिया सुरू करण्यासाठी, शिफारसही बोर्डाला करू शकतो.

## X. दंड

1. कर्मचाऱ्याद्वारे ABAC पॉलिसीचे कोणत्याही प्रकारचे उल्लंघन गांभीर्याने घेतले जाईल आणि त्याची परिणती शिस्तभंगाच्या कारवाईत होईल. यांमध्ये लागू कायदा व कर्मचाऱ्याच्या नोकरीविषयक अटी यांच्यानुसार सेवाबडतर्फीची किंवा त्यापलीकडीलही कारवाई होऊ शकते.

2. लाचलुचपत हा फौजदारी गुन्हा आहे. कर्मचाऱ्यांनी स्वत: लाच दिली किंवा लाचलुचपतविरोधी तसेच भ्रष्टाचारविरोधी कायद्यांचे उल्लंघन करण्याच्या कृतीत एखाद्या व्यक्तीने कोणाला अधिकार दिले किंवा या कामात कोणाला सहाय्य केले किंवा कोणासोबत मिळून कट रचला, तरी त्या व्यक्तीला जबाबदार धरले जाते. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला तुरुंगवास, परिविक्षा, आणि रोख दंड (हा कंपनीतर्फे भरला जाणार नाही) या स्वरूपाची शिक्षा होऊ शकते. उदाहरणार्थ, PCA खाली 3 ते 7 वर्षे कारावासाची शिक्षा होऊ शकते, तसेच दंडही होऊ शकतो (कमाल दंडाच्या रकमेवर कोणतीही मर्यादा नाही).

## XI. ABAC धोरणात सुधारणा

ABAC पॉलिसीच्या अटी वेळोवेळी बदलण्याचे आणि/किंवा सुधारण्याचे हक्क आमची कंपनी राखून ठेवते.

## संलग्नक (ॲनेक्शुअर) A- संबंधित नियमने

युनायटेड स्टेट्स फॉरेन करप्ट प्रॅक्टिसेस ॲक (FCPA), यूके ब्रायबरी ॲक्ट (UKBA), भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा, 1988 (PC कायदा) आणि जगभरातील असे अनेक लाचलुचपतविरोधी आणि भ्रष्टाचारविरोधी (ABAC) कायदे असे स्पष्ट करतात की, लाचलुचपत आणि भ्रष्टाचाराला सर्वत्र मनाई आहे आणि ते बेकायदा आहे. या नियमनांचे उल्लंघन केल्यास त्याची परिणती दंड, शिक्षा, प्रतिष्ठेला बाधा पोहोचणे आणि काही प्रकरणांत फौजदारी कारवाईपर्यंत होऊ शकते. या नियमनांतील काही महत्त्वाच्या तरतुदी खाली थोडक्यात दिल्या आहेत. या नियमनांवर तसेच कंपनी कामकाज करत असलेल्या भौगोलिक प्रदेशांतील प्रचलित नियमांवर अधिक माहिती प्राप्त करण्यासाठी, संबंधित सरकारच्या वेबसाइट्स बघणे किंवा कायदेतज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेणे, योग्य ठरेल.

I. **फॉरेन करप्ट प्रॅक्टिसेस ॲक्ट (FCPA)**

FCPA कायदा अमेरिकेत 1977 साली संमत करण्यात आला. यामध्ये लाचलुचपतविरोधी तसेच लेखापालनाशी संबंधित तरतुदी आहेत. यातील लाचलुचपतविरोधी तरतुदी अमेरिकेतील व्यक्ती व व्यवसायांना (देशांतर्गत मुद्दे), अमेरिकेतील शेअर बाजारांवर सूचित अमेरिकी व परदेशी सार्वजनिक कंपन्यांना किंवा सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशनकडे नियमित अहवाल सादर करणे आवश्यक असलेल्या कंपन्यांना (जारीकर्ते) आणि अमेरिकेच्या सीमेत (प्रादेशिक न्यायक्षेत्र) काम करणाऱ्या विशिष्ट परदेशी व्यक्ती व व्यवसायांना, काम मिळवण्याच्या किंवा टिकवण्याच्या उद्देशाने, परदेशी अधिकाऱ्यांना भ्रष्ट पेमेंट करण्यास, मनाई करतात.

लेखापालनाविषयीच्या तरतुदींनुसार जारीकर्त्यांनी अचूक हिशेब व नोंदी ठेवणे आवश्यक आहे तसेच अंतर्गत लेखापालन नियंत्रणासाठी सुयोग्य प्रणाली राखणेही त्यांच्यासाठी आवश्यक आहे. लेखापालनाच्या तरतुदी व्यक्ती व व्यवसायांना जाणतेपणी खोटे हिशेब लिहिण्यास तसेच अंतर्गत नियंत्रण व्यवस्था अमलात आणण्याच्या नियमाला वळसा घालण्यास प्रतिबंध करतात. डिपार्टमेंट ऑफ जस्टिस (DOJ) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशन (SEC) ही FCPA प्रवर्तन प्राधिकरणे आहेत. FCPCमध्ये, व्यक्ती व कंपन्यांना, उल्लंघनासाठी, फौजदारी व दिवाणी अशा वेगवेगळ्या दंडांची तरतूद आहे.

कॉर्पोरेट दायित्वाची सामान्य तत्त्वे FCPAला लागू आहेत. त्यामुळे कंपनीचे संचालक, अधिकारी, कर्मचारी किंवा एजंट्स, त्यांच्या नोकरीच्या कक्षेत काम करताना, FCPAचे उल्लंघन करतात आणि त्यांचा उद्देश कंपनीला फायदा मिळवून देणे हा असतो, तेव्हा कंपनीवर या उल्लंघनाची जबाबदारी येते. त्याचप्रमाणे अन्य कोणत्याही कायद्याप्रमाणे, DOP आणि SECही कॉर्पोरेट दायित्वाचे मूल्यमापन करताना, पालक-उपकंपनी तत्त्वे तसेच उत्तराधिकारी दायित्वाची तत्त्वे विचारात घेतात. FCPSच्या लेखापालन तरतुदी "जारीकर्त्या"च्या दिशेने असल्या, तरीही जारीकर्त्याच्या लेखापुस्तिका व नोंदींमध्ये एकत्रित उपकंपन्या व संलग्न कंपन्यांचाही समावेश असतो. म्हणूनच जारीकर्त्याच्या नियंत्रणाखालील उपकंपन्या व संलग्न कंपन्यांसाठीही जारीकर्त्याला जबाबदार धरले जाते. परदेशी उपकंपन्या व जॉइंट व्हेंचर्स यांद्वारे लेखापालन तरतुदींचे पालन केले जाईल ही जारीकर्त्याची जबाबदारी असते.

II. **यूके ब्रायबरी कायदा (UKBA)**

युनायटेड किंगडममधील ब्रायबरी ॲक्ट 2010 हा 1 जुलै 2010 रोजी लागू झाला. या कायद्यामध्ये दोन सरसकट गुन्हे समाविष्ट आहेत. यापैकी एक म्हणजे लाच देऊ करणे, लाचेचा वायदा करणे, लाच देणे (सक्रिय लाचखोरी) आणि दुसरा म्हणजे लाचेसाठी विनंती करणे, सहमती दर्शवणे किंवा लाच स्वीकारणे होय (निष्क्रिय लाचखोरी). यामध्ये दोन आणखी गुन्हेही निश्चित करण्यात आले आहेत. त्यातून व्यावसायिक लाचखोरीची समस्या विशेषत्वाने हाताळली जाते. या कायद्याच्या 6व्या कलमात, काम मिळवण्यासाठी किंवा राखण्यासाठी किंवा व्यवसायात लाभ मिळवण्यासाठी परदेशी सार्वजनिक अधिकाऱ्याच्या लाचखोरीसंदर्भातील गुन्हा नमूद करण्यात आला आहे, तर 7व्या कलमात व्यावसायिक कंपनीच्या वतीने लाचखोरीचा प्रकार रोखण्यात असमर्थ ठरल्यामुळे निर्माण होणाऱ्या कॉर्पोरेट दायित्वाचे नवीन स्वरूप हाताळले आहे.

कायद्याच्या 12व्या कलमातील तरतुदीनुसार, न्यायालयांचे कार्यक्षेत्र यूकेमध्ये घडणाऱ्या गुन्ह्यांपुरते असेल पण यूकेबाहेर घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींचे, ब्रिटिश नागरिक म्हणून किंवा यूकेतील रहिवासी म्हणून, यूकेत समाविष्ट यंत्रणा म्हणून किंवा स्कॉटिश भागीदारीमुळे, यूकेशी दृढ संबंध येत असतील, तर ते गुन्हे यूकेतील न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रात येतील. गुन्ह्याप्रकरणी दोषी ठरलेल्या व्यावसायिक कंपनीला दंड ठोठावला जाईल. दोषी ठरलेल्या व्यक्तीला 10 वर्षांपर्यंतचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही ठोठावले जाऊ शकते.

**III. भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा, 1988 (PC कायदा), भारत**

सरकारी खात्यांतील भ्रष्टाचाराला प्रतिबंध करण्यासाठी तसेच भ्रष्ट कारवायांमध्ये गुंतलेल्या सरकारी नोकरांवर कारवाई करून त्यांना शिक्षा करण्यासाठी, भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा,1988 (PC कायदा) संमत करवून घेण्यात आला.

सुधारणा कायद्यातील तरतुदीनुसार, कोणताही सरकारी नोकर, स्वत:साठी किंवा अन्य कोणासाठी, सार्वजनिक कर्तव्याची पूर्तता अयोग्य रितीने किंवा अप्रामाणिकपणाने करण्याच्या हेतूने किंवा सार्वजनिक कर्तव्य न करण्याच्या हेतूने, कोणत्याही व्यक्तीकडून 'अवाजवी लाभ' स्वीकारत असेल किंवा स्वीकारण्याचा प्रयत्न करत असेल, तर तो/ती किमान 3 व कमाल 7 वर्षे कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल व दंडासही पात्र ठरेल. सुधारित कायद्यामध्ये 'अवाजवी लाभा'चा अर्थ कायदेशीर वेतनाखेरीज अन्य कोणत्याही स्वरूपाचे उपकार (आर्थिक किंवा पैशाच्या स्वरूपातील उपकारांपुरते मर्यादित नसलेले) असा देण्यात आला आहे. सुधारणा कायद्यानुसार, एखाद्या व्यक्तीकडून सरकारी नोकराला अवाजवी लाभ दिला जाणे हाही शिक्षापात्र गुन्हा आहे आणि यासाठी 7 (सात) वर्षांपर्यंतचा कारावास व दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. मात्र, एखाद्या व्यक्तीला अवाजवी लाभ देण्याची सक्ती/जबरदस्ती करण्यात आली पण त्या व्यक्तीने असे केल्यानंतर 7 (सात) दिवसांच्या आत याची माहिती संबंधित अधिकाऱ्याला दिली, तर तो/ती शिक्षेस पात्र ठरत नाही.

सुधारणा कायद्यामध्ये व्यावसायिक संस्थेकडून सरकारी नोकराला लाच दिली जाण्याप्रकरणातील गुन्हा विहित आहे. यामध्ये व्यावसायिक संस्थेची व्याख्या केवळ एक मंडळ किंवा समाविष्ट भागीदारी असलेली व

भारतात व्यवसाय करणारी संस्था एवढ्यापुरती मर्यादित नसून, भारताबाहेर समाविष्ट किंवा स्थापन झालेल्या पण भारतात व्यवसाय करणाऱ्या संस्थांचाही यात समावेश करण्यात आला आहे. व्यावसायिक संस्था व या संस्थांशी जोडलेल्या व्यक्तींनी केलेल्या गुन्ह्यांसाठी, सुधारणा कायद्यामध्ये, विशिष्ट तरतूद आहे. जर एखाद्या व्यावसायिक संस्थेने पीसी कायद्यामध्ये समाविष्ट गुन्ह्यांपैकी एखादा गुन्हा केला, तर प्रत्येक संचालक, व्यवस्थापक सचिव किंवा ज्याच्या 'संमती किंवा दुर्लक्षा'मुळे हा गुन्हा झाला असेल त्या प्रत्येक अधिकाऱ्याला, PCAमध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे, जबाबदार धरले जावे अशी तरतूद आहे.

## संलग्नक (ॲनेक्शुअर) B- रेड फ्लॅग इंडिकेटर्स

संशयास्पद व्यवहार किंवा परिस्थितींची संपूर्ण यादी देणे शक्य नसले, तरी कर्मचाऱ्यांनी कोणत्या व्यवहार व परिस्थितींबाबत सावध राहावे आणि रिपोर्टिंग व्यवस्थापक किंवा चीफ एथिक्स कौन्सेलरकडे एकत्रितपणे अथवा व्यक्तीशः, 'रेड फ्लॅग'चा निर्देश करावा, याची यादी खाली दिली आहे:

i. कंत्राटासाठी थर्ड पार्टी कन्सल्टण्टचा वापर करणे आवश्यक आहे आणि थर्ड पार्टीचा प्रमुख किंवा मालक सरकारी अधिकारी आहे;

ii. व्यवसायाकडे पात्रता किंवा संसाधनांची कमतरता आहे, म्हणजेच संभाव्य व्यवसाय भागीदार ऑफर करत असलेल्या सेवा देण्यास सक्षम आहे असे वाटत नाही. कन्सल्टिंग करार किंवा अन्य काही करारांचा वापर करून ज्यांच्याखाली भ्रष्ट पेमेंट्स लपवली जातात अशी खोटी सेवा कंत्राटे म्हणजे लाचलुचपत किंवा भ्रष्ट कारवायांसाठी सामान्यपणे वापरली जाणारी प्रारूपे असतात;

iii. कोणताही संभाव्य भागीदार यशाची हमी देत असेल किंवा परवाने अथवा अन्य सरकारी मंजुऱ्या प्राप्त करण्याच्या क्षमतेचा दावा, ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक अशा वैध पद्धतीचे वर्णन न करता देत असेल तर;

iv. नेहमीपेक्षा वेगळे पेमेंट नमुने किंवा आर्थिक व्यवस्थांनी युक्त असे व्यवहार. त्याचप्रमाणे, प्रचंड कमिशन देण्याची विनंती म्हणजे संभाव्य भ्रष्टाचाराचा इशारा देणारी खूण आहे. त्याचप्रमाणे कमिशनची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची, काहीवेळा परदेशी बँक खात्यात जमा करण्याची, विनंती करण्यात आल्यास अतिरिक्त तपासाची आवश्यकता आहे हे नक्की;

v. करारात ABAC किंवा मनी लॉंडरिंगविरोधी कलमे स्वीकारण्यास नकार देणारी संभाव्य थर्ड पार्टी;

vi. अधिग्रहणापूर्वी केलेल्या चौकशीमध्ये, संभाव्य भागीदाराच्या नावावर लाच देऊ करणे किंवा अन्य कायद्यांचे उल्लंघन करणे किंवा नेहमीपेक्षा वेगळ्या रचनेतील व्यवहार करणे आदी बाबी आढळू शकतात;

vii. संभाव्य भागीदार किंवा त्यांच्याशी संलग्न कंपन्यांच्या प्रकल्पांमध्ये फुगवलेले पे-आउट्स किंवा संशयास्पद रोल्स आढळू शकतात;

viii. संभाव्य थर्ड पार्टी पालकत्वाचे (पेरेंटेज) तपशील पुरवण्यास प्रतिबंध करत असेल किंवा असमर्थ ठरत असेल किंवा ज्या प्रमुखांसोबत, सहयोगींसोबत किंवा पोटकंत्राटदारांसोबत ही कंपनी शुल्क वाटून घेत असेल, त्यांची नावे गुप्त ठेवत असेल तर;

ix. प्रस्तावित कराराखाली विनंती केली असता, थर्ड पार्टी प्रतिपक्ष आपली लेखापुस्तके व नोंदी उपलब्ध करून देण्यास नकार देत असेल तर;

x. एखादा सार्वजनिक अधिकारी विशिष्ट थर्ड पार्टी, कंपनी किंवा व्यक्तीला निवडण्याची किंवा सहभागी करून घेण्याची सूचना, विनंती, आग्रह किंवा मागणी करत असेल आणि विशेषतः या अधिकाऱ्याला व्यवसायावर निर्णायक अधिकार असतील तर;

xi. थर्ड पार्टी कंपनीच्या सहभागाशिवाय सरकारी अधिकाऱ्यांची बोलणी करण्याचा आग्रह धरत असेल तर;

xii. थर्ड पार्टीला दिले जाणारे शुल्क, कमिशन किंवा व्हॉल्युम डिसकाउंट बाजारभावाच्या तुलनेत खूपच चढा असेल तर;

xiii. थर्ड पार्टी लाच देण्यासाठी ओळखली जात असेल, किंवा त्यांना लाच दिली जावी अशी मागणी करत असेल किंवा सरकारी अधिकाऱ्यांसोबत "विशेष नातेसंबंध" ठेवण्यासाठी ओळखली जात असेल तर;.

**संलग्नक (ॲनेक्शुअर) C- कर्मचाऱ्याद्वारे घोषणापत्राचा मसुदा**

मी, खाली स्वाक्षरी करणारा/री, येथे प्रमाणित करतो/ते की,

- मी कंपनीची ही ABAC पॉलिसी वाचली आहे आणि समजून घेतली आहे.
- मी माझ्या कंपनीतील नोकरीच्या कार्यकाळात, ABAC पॉलिसीतील आवश्यकतांची पूर्तता करेन अशी हमी देतो/ते.
- मी, माझ्या कंपनीप्रती असलेल्या तसेच कंपनीच्या वतीने पार पाडण्याच्या कर्तव्यांदरम्यान किंवा कंपनीतील नोकरीच्या कार्यकाळादरम्यान व्यक्तिगत क्षमतेमध्ये, ABAC पॉलिसीनुसार समजून घेतलेल्या, कोणत्याही लाचलुचपत किंवा भ्रष्टाचाराच्या कृतींमध्ये सहभागी होण्याचा प्रयत्न करणार नाही.
- ABAC पॉलिसीचे पालन होत नसल्याचे उदाहरण मला आढळल्यास, मी अशा प्रकारचे उदाहरण तातडीने कंपनीतील संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देईन.

कर्मचाऱ्याचे नाव______________________

कर्मचारी कोड ______________________

हुद्दा ______________________

विभाग ______________________

तारीख ______________________

स्वाक्षरी ______________________